बुक – पोस्ट

श्री/श्रीमती ____________________

______________________________

______________________________

______________________________

प्रेषक :
अमर हिंद मंडळ, दादर
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई – ४०० ०२८.

ग्राफिटेक, 92-A वि. ना. पुरव मार्ग, चुनाभट्टी, सायन, मुंबई – ४०० ०२२.
फोन – ५२२ ८१ ४२

फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई – ४०० ०२८

(स्थापना : १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६ १९४९)

# * द्वैवार्षिक अहवाल *

## १ एप्रिल १९९५ ते ३१ मार्च १९९७

अमरवाडी,
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई – ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल १९९५ ते ३१ मार्च १९९७ पर्यंत


**विश्वस्त** : श्री. जगन्नाथ शं. परब
श्री. दिनकर शं. पाटील

**अध्यक्ष** : श्री. शंकरराव ना. साळवी
**उपाध्यक्ष** : श्री. एकनाथ ना. साटम
: श्री. मधुकर ज. फडके

**कार्याध्यक्ष** : श्री. चिंतामणी वि. नागले

**कार्योपाध्यक्ष** : श्री. रमेश मा. वरळीकर

**कार्यवाह** : श्री. उमेश व्यं. शेणॉय

**सं. कार्यवाह** : श्री. संजीव ग. ठाकूरदेसाई (स्वीकृत) (दि. १८-९-९५ पर्यंत)
श्री. दीपक ना. पडते (दि. १८-१०-९५पासून)

**कोषाध्यक्ष** : श्री. सतीश श. रेडीज

**सदस्य :**

श्री. भास्कर भि. केरकर
श्री. अरुण अ. देशपांडे
श्री. विष्णू अ. कानविंदे
श्री. श्रीकृष्ण शं. राणे
श्री. दीपक ना. पडते (दि. १८-१०-९५पर्यंत)
श्री. विनोद. शं. हडप
श्री. चारुदत्त शां. थरवल
श्री. विष्णू दे. हरमले (स्वीकृत)
श्री. संजय वि. पेडणेकर (स्वीकृत)
श्री. दत्ता अ. सावंत (स्वीकृत)


# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई – ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २६ ऑक्टोबर १९९७ रोजी दुपारी ४.०० वाजता मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव ना. साळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील कामे :**

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. द्वैवार्षिक अहवाल (सन १९९५-९६ व १९९६-९७सालचे) मंजूर करणे.
३. हिशेब व ताळेबंद (सन १९९५-९६ व १९९६-९७सालचे) मंजूर करणे.
४. हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. १९९७-९८चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६. इमारत निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. निवडणुकींचा निकाल जाहीर करणे.
८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

दि. २ सप्टेंबर १९९७

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
**उमेश व्यं. शेणॉय**
कार्यवाह

**सूचना :**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना-नियमानुसार ही सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल.

२) सभासदांना हिशेबासंबंधी माहिती हवी असल्यास ती कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६ ते ८) शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर १९९७ पर्यंत मिळेल.

३) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरुपात गुरुवार दिनांक २३ ऑक्टोबर १९९७ पर्यंत मंडळाच्या कार्यालयांत सायंकाळी ६ ते ८ पर्यंत (रविवार सोडून) आणून द्यावेत.

४) ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी त्यांचे बदललेले पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी/संबंधितांनी मंडळास तद्संबंधीची माहिती त्वरित कळवावी.

५) निवडणुकीचा कार्यक्रम याच अहवालात वेगळा छापला आहे तो पाहावा.[पुढील सहा वर्षांसाठी विश्वस्त मंडळावर तीन विश्वस्तांची निवड करणे, त्याचप्रमाणे पुढील तीन वर्षांसाठी अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीची (११ जागा) निवड करणे यासाठीचा हा निवडणूक कार्यक्रम आहे.]

**[टीप : निवडणुकीच्या कार्यक्रमाची सूचना वेगळी दिली आहे, ती पाहावी.]**



# अमर हिंद मंडळ

## अमरवाडी, गोखले रोड (उ.), दादर, मुंबई – ४०० ०२८

(स्थापना १९४७)

[सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६-१९४९]

## निवडणुकीचा कार्यक्रम

अमर हिंद मंडळाच्या घटनेप्रमाणे यावर्षी पुढील सहा वर्षांसाठी विश्वस्त मंडळावर तीन विश्वस्तांची निवड करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुढील तीन वर्षांसाठी अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीच्या ११ सभासदांची निवड करण्यात करण्यात येणार आहे. कार्यकारी समितीने या वेळच्या निवडणुकींसाठी निवडणूक अधिकारी म्हणून डॉ. अनिल वाकणकर यांची नेमणूक केलेली आहे.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या संमतीने निवडणुकीसंबंधीचा खालील कार्यक्रम सर्व सभासदांच्या माहितीसाठी जाहीर करण्यांत येत आहे.

(१) मंडळाच्या घटनेप्रमाणे पुढील सहा वर्षांसाठी विश्वस्त (३ जागा) तसेच तीन वर्षांसाठी अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) आणि कार्यकारी समितीचे सभासद (११ जागा) यांची निवड करण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन सही करून उमेदवारी अर्ज घेऊन जाणे बंधनकारक आहे.

(२) वरील जागांसाठी भरावयाचे उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत दि. ८ ऑक्टोबर १९९७ ते १५ ऑक्टोबर १९९७ पर्यंत सायंकाळी ६॥ ते ८ या वेळेत मिळतील.

(३) पूर्ण भरलेले उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत गुरुवार दिनांक १६ ऑक्टोबर १९९७ पर्यंत वरील वेळेत स्वीकारण्यात येतील.

(४) अर्जांची छाननी शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर १९९७ रोजी सायंकाळी ७ वाजतां करण्यात येईल.

(५) वैध उमेदवारांची यादी सोमवार दिनांक २० ऑक्टोबर १९९७ रोजी सायंकाळी ७ वाजता जाहीर करण्यात येईल.

(६) उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख व वेळ, दिनांक २२ ऑक्टोबर, १९९७ सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील. ज्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचा असेल त्यांनी लेखी स्वरूपात तसा अर्ज देणे आवश्यक आहे.

(७) उमेदवारांची अंतिम यादी गुरुवार दिनांक २३ ऑक्टोबर १९९७ रोजी सायंकाळी ७ वाजता मंडळाच्या सूचना फलकावर लावण्यांत येईल.

(८) विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीचे सभासद यांच्या भरावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवारी अर्ज आल्यास निवडणूक घेण्यात येईल.

(९) निवडणूक रविवार दिनांक २६ ऑक्टोबर १९९७ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मंडळाच्या जागेत घेण्यात येईल.

(१०) निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होईल.

(११) मतदानासाठी पात्र असणारा प्रत्येक तहहयात सभासद ज्या पदांसाठी जितक्या जागा आहेत तितकी मते देवू शकेल. त्यापेक्षा अधिक मते दिल्यास ती मतपत्रिका बाद ठरविण्यात येईल.

(१२) निवडणुकीसंबंधी कोणतीही तक्रार, तंटा, आक्षेप असल्यास तो लेखी स्वरूपांत निवडणुक अधिकाऱ्याकडे देण्यांत यावा. यासंबंधीचा निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम स्वरूपाचा असेल आणि तो सर्वांना बंधनकारक राहील.

(१३) निवडणुकीची वेळ संपल्यावर निवडणूक अधिकारी मतमोजणी करून अंतिम निर्णय त्याच दिवशी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत जाहीर करतील.

दि. २ सप्टेंबर १९९७

**उमेश व्यं. शेणॉय**
(कार्यवाह)
कार्यकारी समितीसाठी

**[टीप : वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना वेगळी दिली आहे, ती पाहावी.]**



# द्वैवार्षिक अहवाल

## दि. १ एप्रिल १९९५ ते दि. ३१ मार्च १९९७

***सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,***

***सादर वन्दे,***

*मंडळाच्या कार्याचा द्वैवार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करतांना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.*

*या कालावधीत आपल्या बहुमोल सहकार्याने तसेच अनेक हितचिंतकांकडून मिळालेल्या हार्दिक सहयोग आणि आर्थिक पाठबळामुळे मंडळाचे अनेक सामाजिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक तसेच बहुविध सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरीत्या कार्यवाहीत आणले गेले. या सर्व कार्यक्रमांना चांगलाच प्रतिसाद आणि प्रसिध्दीही लाभली.*

*मंडळाच्या कार्यकारी समितीने वर्षारंभी खालील भविष्यकालीन योजना डोळ्यासमोर ठेवलेल्या होत्या.*

* *मंडळाच्या नवीन वास्तूची बांधकाम योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील राहाणे.*
* *विविध कार्यक्रमांद्वारे मंडळाचा नावलौकिक वाढवणे.*
* *मंडळाची आर्थिक स्थिती मजबूत करणे.*
* *मंडळाचा सुवर्णमहोत्सव यथायोग्य रितीने साजरा करणे.*

*आपणास कळविण्यास आनंद होत आहे की बांधकाम योजनेचा आराखडा अखेरच्या मंजुरीसाठी अंतिम फेरबदलासह पाठविण्यात आलेला आहे. राज्याचे मुख्यमंत्री मा. मनोहर जोशी हे स्वतः जातीने याबाबतीत लक्ष घालीत आहेत. लवकरच आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने आणि सहकार्याने ही योजना मूर्त स्वरूपात येईल याची आम्हाला परिपूर्ण खात्री आहे.*

*अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवून देखील मंडळाची आर्थिक स्थिती आजही समाधानकारक आहे हे आपणांस जमाखर्च/ताळेबंदपत्रकांवरून विदीत होईल. मंडळाने वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची जी कार्यवाही केली त्यांना वृत्तपत्रे आणि इतर प्रसारमाध्यमांद्वारे मिळालेल्या प्रसिद्धीमुळे मंडळाच्या नावलौकिकात निश्चितच भर पडली आहे.*

*मंडळाच्या कार्याचा प्रत्येक वर्षाचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.*

# दि. १ एप्रिल १९९५ ते दि. ३१ मार्च १९९६

**सभा :** वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या एकूण १४ सभा आणि कार्यकारी समिती व विश्वस्त यांची १ संयुक्त सभा झाली. (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट १ पान ३९ पाहा.)

**तहहयात सभासद :** या कालावधीत एकही नवा तहहयात सभासद नोंदविण्यात आला नाही.

**इमारत निधी :** अहवाल काळात रु. ७५,०००/- इमारत निधीमध्ये वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :** दिनांक १ जानेवारी १९९६ ते ३० जून १९९६ या दरम्यानच्या काळासाठी वर्तमानपत्रांतून जाहिरात देवून निविदा 'पूर्ण केटरिंग' तसेच 'फक्त भांडी व डेकोरेशन' या दोन्ही बाबींसाठी मागविण्यात आल्या. आलेल्या निविदांमधून 'हार्दिक केटरर्स आणि डेकोरेटर्स' यांची निवड करण्यांत येवून त्यांना 'फक्त भांडी व डेकोरेशन'ची ठेकेदारी देण्यांत आली.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ४८वी वसंत व्याख्यानमाला दि. २० एप्रिल ते ३० एप्रिल १९९५ या दरम्यान आयोजित करण्यात आलेली होती. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन माननीय मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांच्या ''आमच्या स्वप्नांतील महाराष्ट्र'' या विषयावरील व्याख्यानाने झाले. यानंतर विविध विषयांवरील एकूण दहा व्यासंगपूर्ण व्याख्याने झाली. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट २ पान ४० पाहा.) पहिल्या दिवसापासूनच व्याख्यानमालेला भरपूर श्रोतृवृंद उपस्थित होता.

व्याख्यानमालेचे कापडी फलक बनविण्यासाठी मा. श्री. उदयदादा लाड यांनी रु. १०,०००/- चे वैयक्तिक आर्थिक सहाय्य दिले. या कार्यक्रमाच्या वेळी प्रांगणांत लावण्यात आलेल्या जाहिरात फलकांद्वारे प्राप्त झालेले रु. २९,०००/- सुवर्ण महोत्सव निधीत वर्ग करण्यांत आले.

**क्रीडा विभाग :**

**खो-खो :** दरवर्षीप्रमाणे यंदाही जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेच्या सर्व गटात मंडळाचा सहभाग होता. सांघिक यश फार मोठे मिळाले नसले तरी काही खेळाडूंची वैयक्तिक कामगिरी उच्च दर्जाची होती.



- राज्य आणि अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवडल्या गेलेल्या मुंबई शहर संघाच्या पुढे नमूद केलेल्या गटात मंडळाच्या खालील खेळाडूंची निवड झाली.

  खुला गट – कु. शिल्पा तोरणे, कु. विशाखा सुर्वे (कुळगाव स्पर्धा)
  ज्युनिअर गट – कु. विशाखा सुर्वे, कु. प्रीती धुरी (फलटण स्पर्धा)
  सब-ज्युनिअर गट – कु. संकेत पेठे, कु. कविता धुरी, कु. शुभदा धुरी (मिरज स्पर्धा)

  कु. प्रीती धुरी हिची महाराष्ट्र शालेय संघात निवड झाली होती, परंतु राष्ट्रीय शालेय खो-खो स्पर्धा झाली नाही. वाशी (नवी मुंबई) येथे झालेल्या खुल्या गटाच्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात राखीव खेळाडू म्हणून कु. शिल्पा तोरणे हिची निवड झाली.
- श्री. प्रफुल्ल (बाळा) पाटील यांची मुंबई ज्युनिअर (मुली) संघाच्या निवड समितीवर तसेच संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली.
- श्री. संजय पेडणेकर व सौ. उत्कर्षा (शेणॉय) तळेकर यांची अनुक्रमे मुंबईच्या सब-ज्युनिअर (मुलगे) व महिला संघाच्या निवड समितीवर नियुक्ती झाली.
- जिल्हा तसेच जोड जिल्हास्तरीय स्पर्धेतून आणि मुंबई व औरंगाबाद महापौर चषक राज्य पातळी स्पर्धांतून मंडळाच्या उभय संघांचा सहभाग होता. ठाणे व सोलापूर या महानगरींच्या स्पर्धांचे फक्त महिला संघाला आमंत्रण होते. या सर्व स्पर्धांतून मंडळाच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी नोंदविली.
- अहवाल काळात मंडळाने सब-ज्युनिअर गटाची जिल्हा अजिंक्यपद व चाचणी स्पर्धा यशस्वीपणे आयोजित केली. नियोजन, पारितोषिके व प्रसिद्धी या संयोजनाच्या महत्त्वाच्या आघाड्यांवर आदर्श ठसा उमटविला गेला. श्री. प्रदीप गंधे (बॅडमिन्टन), कु. फुलवा बर्वे (जिम्नॅस्टिक) अशा राष्ट्रीय किर्तीच्या खेळाडूंना समारंभ सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करून चांगला पायंडा पाडला. मंडळाच्या खेळाडूंना वैद्यकीय मार्गदर्शन करणारे शुश्रुषा हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. विजय देशमुख तसेच श्री. नागेश फोवकार, संचालक, नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. सहकारी बँक यांची उपस्थिती सुद्धा उत्साही ठरली. याच स्पर्धेप्रसंगी ज्येष्ठ क्रीडापत्रकार श्री. वि. वि. करमरकर व श्री. शिवराम सोनावडेकर यांचा भेटवस्तू देऊन खास सत्कार करण्यात आला.

● खो-खोचा दैनंदिन सराव श्री. रमेश वरळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वश्री प्रफुल्ल पाटील, रमेश नाटेकर, विजय राणे व संजय पेडणेकर हे प्रामुख्याने पाहतात, अधूनमधून ज्येष्ठ खेळाडूंचाही सहभाग असतो. दैनंदिन सरावात असलेले खेळाडू आपापल्या शाळांतून/महाविद्यालयांतून खेळताना उल्लेखनीय कामगिरी करत असतात. खेळाडूंना सामन्यांचा अनुभव मिळावा म्हणून मित्रत्वाच्या सामन्यांचे आयोजन केले गेले.

**कबड्डी :** नवीन व उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या विचारांचे फलित म्हणून शालेय मुलींचा नव्या दमाचा संपूर्ण नवा संच आकार घेत आहे. प्रशिक्षकांची जिद्द व खेळाडूंची मेहनत तसेच त्यांचा उत्साह व स्थानिक स्पर्धांतील चमक लक्षात घेतली तर ही नवी संकल्पना अत्यंत यशस्वी ठरेल असा विश्वास वाटतो. कबड्डीचा सराव सर्वश्री विष्णू हरमले, विजय राणे व दिलीप भावे चिकाटीने करून घेतात.

**ॲथलेटिक्स :** या क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण मंडळात दिले जात नाही, इच्छा असूनही ते शक्य होत नाही तथापि खोखो-कबड्डीतील वैयक्तिक कौशल्याच्या जोरावर काही खेळाडू छोट्या-मोठ्या पल्ल्याच्या धाव शर्यतीत उत्साहाने भाग घेतात. मुंबई जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने झालेल्या जिल्हा पातळीच्या शर्यतीत प्रमोद दोडके (१०० मीटर–२ रा क्रमांक), विशाखा सुर्वे (४०० मीटर–३ रा क्रमांक), कविता धुरी (३०० मीटर–२ रा क्रमांक) आणि शुभदा धुरी (१०० मीटर–२ रा क्रमांक) या मंडळाच्या खेळाडूंनी पराक्रम केला.

**इतर :** ऑगस्ट १९९५ मध्ये ''स्त्री शरीर : खेळ व विज्ञान'' या विषयावर खास महिला खेळाडूंसाठी चर्चासत्र आयोजित केले होते. डॉ. प्रतिभा गोसावी, डॉ. धनगौरी शेणवी, सौ. ज्योती म्हापसेकर, प्रा. सौ. नीता ताटके यांनी उपस्थित मुलींना बहुमोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी विज्ञान परिषदेने चित्रफीत दाखवून विषयाचे महत्त्व सहज पटवून दिले. मंडळातील खेळाडूंच्या बरोबरीनेच इतर संघांच्या खेळाडूंनीही या चर्चासत्राचा लाभ घेतला.

* मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव साळवी यांची 'महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन'च्या कार्यवाहपदी बिनविरोध निवड झाली.
* मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री. एकनाथ साटम आणि कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांची 'महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन'च्या अनुक्रमे 'उपाध्यक्ष' आणि 'खजिनदार' पदी बिनविरोध निवड झाली.



* मंडळाचे उपाध्यक्ष श्री. एकनाथ साटम आणि कार्यकारी समिती सदस्य श्री. भास्करराव केरकर यांची महाराष्ट्र खो-खो संघटनेच्या श्री शिवछत्रपती आणि अर्जुन पुरस्कार शिफारस समितीवर निवड करण्यात आली.
* अभ्यासांत सुयश मिळविलेल्या मंडळाच्या खेळाडूंचे खास कौतुक केले जाते.
* 'सॅफ गेममध्ये भाग घेतलेल्या' भारताच्या खेळाडू चमूचे प्रमुख म्हणून मंडळाचे अध्यक्ष श्री. शंकरराव साळवी यांची नेमणूक झाली.

**कलाविभाग :** सर्वश्री चिंतामणी नागले, विनोद हडप, दत्ता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने अनेक उपक्रम आयोजित केले.

* **बालनाट्य प्रशिक्षण शिबिर :** २३ एप्रिल १९९५ ते १ मे १९९५. या कालावधीत मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे हे शिबिर मंडळातर्फे प्रथमच आयोजिले. ५० शिबिरार्थींचा सहभाग. संचालक अमित ओक, सहसंचालक सुभग ओक, मयुरेश क्षेत्रमाडे, वैभवी हुल्याळकर यांचे सुयोग्य मार्गदर्शन लाभले. अभिनेते विजय गोखले, संजय क्षेमकल्याणी यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली.
* ३५ व्या महाराष्ट्र राज्य स्पर्धेत श्री. अविनाश स्मार्त लिखित आणि श्री. रामकृष्ण पार्टे दिग्दर्शित 'क्षितिजाच्या पिंगट डोळ्यातून ' हे नाटक दि. १३ नोव्हें. ९५ ला सादर करण्यात आले.
* प्रेक्षक न्यायाधीश राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा : एकांकिका स्पर्धेच्या निर्णय प्रक्रियेत प्रेक्षकांना सामावून घेणे आणि प्रेक्षकांसमोर रंगमंचावर खुल्या चर्चेद्वारे उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. सुहास कामत, श्री. दत्ता सावंत, श्री. अभय हडप यांनी विषेश परिश्रम घेतले. स्पर्धेची प्राथमिक फेरी कामगार कल्याण मंडळ नायगाव येथे दि. ५ नोव्हें/६ नोव्हें ९५ रोजी श्री. विनायक पडवळ, श्री. अरूण घाडीगावकर, श्री. अविनाश स्मार्त. कु. अनुराधा राजाध्यक्ष यांच्या परीक्षणाखाली घेतली गेली. तर अंतिम फेरीचे प्रेक्षक न्यायाधीश श्री. खंडेराव ढगे, श्री. अरूण राजदेरकर, श्री. अजीत मोरे, श्री. अनिल वाकडे, श्री. दिलीप संत होते. पारितोषिक वितरण समारंभ दि. १५ नोव्हेंबर १९९५ रोजी महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक-कार्य मंत्रि मा. ना. प्रमोद नवलकर यांच्या हस्ते पार पडला.
* नाट्यदर्पण आयोजित 'कल्पना एक आविष्कार अनेक' या स्पर्धेत श्री. दत्ता सावंत लिखित/दिग्दर्शित 'अरे पुन्हा आयुष्याच्या' ही

एकांकिका सादर करण्यात आली. कु. आश्विनी मोरे, कु. जान्हिवी बोरगावकर, सौ. हेमा घरत, श्री. रमेश कदम यांचा सहभाग एकांकिकेसाठी लाभला.

**इतर कार्यक्रम :** दिनांक १४ ऑगस्ट १९९५ च्या रात्रौ 'दादर माटुंगा कल्चरल सेंटर' मध्ये मा. श्री. उदयदादा लाड पुस्कृत 'हास्यधारा' हा कविसंमेलनाचा कार्यक्रम मंडळाच्या वतीने सादर करण्यांत आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रामदास फुटाणे आणि प्रा. फ. मुं. शिंदे (औरंगाबाद) यांनी केले. श्री. अशोक नायगांवकर, डॉ. विठ्ठल वाघ (अकोला), श्री. नारायण सुमंत (पिंपळखुंटा), श्री. प्रकाश घोडके (मिरजगांव), श्री. सतीश देशमुख (नाशिक), श्री. प्रकाश होळकर (लासलगांव), श्री. अशोक बागवे इत्यादी महाराष्ट्रातील नामवंत तसेच उद्योन्मुख कवींनी या कार्यक्रमांत सहभाग नोंदविला.

* स्वातंत्र्यदिन : संस्थेचे अध्यक्ष श्री. शंकरराव साळवी यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्यदिन ध्वजवंदनाने साजरा करण्यात आला.
* श्री. रविंद्र मटकर यांच्या टपाल तिकीट संग्रहाद्वारे तसेच त्यांनी स्वतः तयार केलेल्या पोस्टरच्या सहाय्याने वन्य प्राणी-पक्षी यांच्याबद्दल माहिती देणारे प्रदर्शन मंडळात दि. १६ ते १८ नोव्हेंबर १९९५ या दरम्यान आयोजित करण्यांत आले. उद्घाटन प्रसंगी नगरसेवक श्री. गणेश महाले, इंडियन एज्यु. सोसायटीचे विश्वस्त श्री. माणिकराव लोटलीकर, जगप्रसिद्ध फिलाटेलिस्ट श्री. धीरुभाई मेहता व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.
* प्रजासत्ताक दिनी मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. पा. वि. चंद्रात्रेय यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यांत आले. याच दिवशी सायंकाळी मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त ''हिंदोळे स्वरांचे'' हा मराठी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यांत आला.
* दिनांक १८ फेब्रुवारी १९९६ रोजी मंडळाची द्वैवार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणांत पार पडली.
* अहवालकाळांत पाण्याची नवीन टाकी बसविण्यांत आली. तसेच गटाराची डागडुगी आणि समागृहाची तात्पुरती रंगरंगोटीही करण्यांत आली.
* अहवालकाळांत धर्मदाय आयुक्तांच्या कचेरीकडून मंडळाच्या कार्याची व कागदपत्रांची पहाणी करण्यांत आली. त्यांनी मंडळाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.



* प्रतिवर्षाप्रमाणे सभासदांना आणि मंडळाच्या हितचिंतकांना दीपावली शुभेच्छा पत्रे पाठविण्यांत आली.
* 'मॉर्डन इंग्लिश स्कूल,' 'इंडियन एज्यु. सोसायटीची प्राथमिक शाळा' यांना त्यांच्या क्रीडा स्पर्धांसाठी क्रीडांगण मोफत उपलब्ध करून देण्यांत आले.

## दिनांक १ एप्रिल १९९६ ते ३१ मार्च १९९७

**सभा :** या कालावधीत कार्यकारी समितीच्या एकूण १० सभा झाल्या. (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट ३ पान ३९ पाहा.)

**तहहयात सभासद :** दि. १८ फेब्रुवारी १९९४ च्या सर्वसाधारण सभेत निर्णय घेतल्याप्रमाणे मंडळाचे कायदा सल्लागार ॲड. ए. ए. इनामदार यांच्या लेखी सल्ल्यानुसार सुवर्णमहोत्सवी काळांत मंडळाच्या उपयोगी पडणारे तसेच मंडळाचे कार्यकर्ते खेळाडू आणि हितचिंतक अशा सुमारे १०० जणांना तहहयात सभासद करून घेण्याचा निर्णय दिनांक २७-८-९६ च्या कार्यकारी समितीच्या सभेत घेण्यांत आला. या निर्णयानुसार अहवाल काळांत एकूण ९९ तहहयात सभासद करून घेण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :** 'हार्दिक केटरर्स ॲन्ड डेकोरेटर्स' यांच्या पूर्वीच्या कामाचे मूल्यमापन करून दिनांक १ जुलै १९९६ ते ३१ डिसेंबर १९९६ पर्यंत त्यांना ठेकेदारीसाठी मुदतवाढ देण्यांत आली. त्यांच्या विनंतीनुसार ही मुदतवाढ नंतर ७ जानेवारी १९९७ पर्यंत वाढविण्यांत आली. तद्नंतर पुन्हाः निविदा मागविण्यांत येवून दिनांक ८ जानेवारी १९९७ ते ३० जून १९९७ या कालावधीसाठी त्यांनाच मुक्रर करण्यात आले.

**इमारत निधी :** अहवालकाळांत रु. २५,०००/- इमारत निधीमध्ये वर्ग करण्यात आले.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ४९ वी वसंत व्याख्यानमाला रविवार दिनांक २१ एप्रिल १९९६ ते मंगळवार दिनांक ३० एप्रिल १९९६ या दरम्यान आयोजित करण्यांत आली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा श्रीमती शांता शेळके यांच्या 'मराठी भाषेची बदलती वळणे' या विषयावरील अभ्यासपूर्ण व्याख्यानाने झाली. प्रा. राम शेवाळकर, डॉ. यशवंत पाठक, डॉ. वि. गो. कुलकर्णी, प्रा. मधुकर तोरडमल, श्री. कुमार केतकर इ. व्यासंगी वक्त्यांनी ही व्याख्यानमाला चांगलीच रंगविली आणि सदोदित दाद येणाऱ्या रसिक श्रोतृवर्गाने देखील

आपल्या प्रतिसादाने या व्याख्यानमालेला यशस्वी केले. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट ४ मलपृष्ठ ३ पाहा.)

**क्रीडाविभाग :**

**खो-खो :** * जिल्हा अजिंक्यपदाच्या सर्व गटात सहभाग देण्याची परंपरा यंदाही कायम राखली. ज्युनिअर (१६ वर्षांतील) मुलींच्या गटाचे अजिंक्यपद मिळवून मंडळाच्या खेळाडूंनी मंडळाचा नावलौकिक वाढविला प्रीती धुरी व श्वेता कांबळी यांच्या अष्टपैलू खेळाला इतर मुलींची सुंदर साथ लभल्यामुळे हे यश संपादन करता आले.

* राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात मंडळाच्या पुढील खेळाडूंची निवड झाली.
खुला गट – कु. शिल्पा तोरणे (गोरेगाव – मुंबई उपनगर स्पर्धा)
ज्युनिअर गट – कु. अमित काजारे, कु. प्रीती धुरी, श्वेता कांबळी व कविता धुरी (मुंबई – दादर स्पर्धा)
सब-ज्युनिअर गट – शुभदा धुरी व प्रसाद कांबळे (मुंबई – दादर स्पर्धा).

* कु. प्रीती धुरी व कु. शुभदा धुरी यांची मुंबई जिल्हा संघाच्या अनुक्रमे ज्युनिअर व सब ज्युनिअर गटाच्या कर्णधार पदी निवड झाली.

* राज्य स्पर्धेत कु. प्रीती धुरीला सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा बहुमान मिळाला, यापूर्वी (१९९४-९५) सब ज्युनिअर गटातही तिने असाच पराक्रम केला होता, आता कु. प्रीती नव्या विक्रमाच्या उंबरठ्यावर आहे. याच स्पर्धेत कु. श्वेताने सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडूचे पारितोषिक घेतले तर सब ज्युनिअर गटात कु. शुभदा धुरीची सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड झाली.

* राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात पुढील खेळाडू निवडल्या गेल्या :
खुला गट – कु. शिल्पा तोरणे (नाशिक स्पर्धा), त्याचप्रमाणे नाशिक येथील पश्चिम विभागीय स्पर्धा.
ज्युनिअर गट – कु. प्रीती धुरी व कु. श्वेता कांबळी (आंध्र स्पर्धा)
सब-ज्युनिअर गट – कु. शुभदा धुरी, (सिलीगुडी, प. ब. स्पर्धा) कु. शुभदा महाराष्ट्राची कर्णधार होती.



**एकाच हंगामात राज्य स्पर्धेतील दोन सर्वोत्कृष्ट अष्टपैलू, जिल्हा संघांची दोन कर्णधारपदे, राष्ट्रीय स्पर्धेतील तिन्हीही गटात मंडळाचे प्रतिनिधित्व आणि राज्य संघाचे एक कर्णधारपद असा चौफेर पराक्रम मंडळाच्या खो-खो इतिहासात प्रथमच घडला.**

* सिलीगुडी येथे झालेल्या सब-ज्युनिअर अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी झालेल्या महाराष्ट्र संघाचे प्रमुख म्हणून श्री. एस्. एस्. राणे यांची तर मुलींची व्यवस्थापिका म्हणून कु. अपर्णा वैद्य यांची निवड झाली होती. तेथेच फेडरेशन चषकासाठी झालेल्या स्पर्धेकरिता महाराष्ट्र महिला संघाच्या व्यवस्थापिकापदी सौ. आरती (नाईक) चव्हाण यांची नियुक्ती झाली होती.

* बीड येथे झालेल्या ज्युनिअर कॉलेज राज्य स्पर्धेत रुपारेल कॉलेज तर्फे कु. शीतल चोपरा हिची मुंबई संघात निवड झाली.

* आंतर विद्यापीठ खोखो स्पर्धेत एस्. एन्. डी. टी. विद्यापीठ संघाचे कु. वैशाली शेट्ये व कु. जयश्री यादव यांनी प्रतिनिधित्व केले. ॲथलेटिक्स स्पर्धेसाठीही कु. वैशालीची निवड झाली होती. एकाच हंगामात दोन खेळात विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणारी कु. वैशाली ही मंडळाची पहिली खेळाडू आहे.

* कु. प्रीती धुरीला यंदाची राज्य क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली.

* प्रशिक्षण शिबिर – मे १९९६ मध्ये शालेय मुलींसाठी ७ दिवसांचे कबड्डी – खोखो शिबिर आयोजित केले होते. त्यात कबड्डीसाठी ४७ मुलींनी व खोखोसाठी ४३ मुलींनी सहभाग दिला. कबड्डीकरिता राष्ट्रीय खेळाडू सौ. लीला (पाटील) कोरगावकर या नियमित येत होत्या व मंडळाचे प्रशिक्षक त्यांना मदत करत होते. खोखो शिबिरात पूर्णपणे मंडळाच्या प्रशिक्षकांनी व जेष्ठ खेळाडूंनी मार्गदर्शन केले. खोखो राष्ट्रीय पंच श्री. साईनाथ देसाई यांचेही मार्गदर्शन लाभले. या शिबिराला कबड्डीच्या राष्ट्रीय किर्तीच्या खेळाडू सौ. चित्रा (नाबर) केरकर, खोखोचे पहिले एकलव्य पारितोषिक विजेते श्री. विश्वनाथ मयेकर, सौ. लीला (फडके) केळकर खोखोच्या राष्ट्रीय खेळाडू डॉ. सौ. प्रतिभा (गोखले) गोसावी व सौ. हेमलता (नरवणकर) देशमुख तसेच जिमनॅस्टिक डॉ. धनगौरी शेणवी यांच्या भेटी फार परिणामकारक ठरल्या. कबड्डी संघटक श्री जया शेट्टी यांचेही मार्गदर्शन उपयुक्त ठरले. या शिबिराप्रसंगी खास मुलींच्या

मातांसाठी एक मार्गदर्शिका प्रकाशित करण्यात आली. एक आदर्श उपक्रम म्हणून अनेकांनी त्याचे स्वागत केले.

* स्पर्धा व संमेलन : मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मंडळाने यंदा सब-ज्युनिअर गटाची राज्य अजिंक्यपद स्पर्धा संयोजित केली. या स्पर्धेला जिल्हा संघांचा विक्रमी प्रतिसाद लाभला. क्रीडांगण, निवास, पारितोषिके, भोजन-अल्पोपहार, प्रसिद्धी व नियोजन अशा महत्त्वाच्या सर्व बाजूने स्पर्धा यशस्वी झाली. या स्पर्धा संयोजनात मंडळाच्या छोट्या-मोठ्या असंख्य कार्यकर्त्यांनी भरपूर मेहनत घेतली. अनेकांना संघटनात्मक कार्याचा नवा अनुभव मिळाला आणि त्यांचा आत्मविश्वास वाढला.

मंडळाच्या पटांगणात खो-खोची दोन क्रीडांगणे बसणे शक्यच नव्हते तशी कल्पना राज्य संघटनेला दिली होती. दोन भिन्न ठिकाणी राज्य स्पर्धा असा नवा प्रकार प्रथमतःच सर्वांपुढे आला. याकरिता 'विजय क्लब'चे उत्तम सहकार्य लाभले. महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस श्री. माधवराव पाटील व ज्येष्ठ पत्रकार श्री. वि. वि. करमरकर यांच्या विनंतीनुसार या स्पर्धेचे शिवधनुष्य उचलण्याचा मंडळाने निर्णय घेतला आणि सांघिक एकजुटीच्या जोरावर प्रयत्न यशस्वी करून दाखवला.

हार्दिक कॅटररचे श्री. गोविंद कुलकर्णी, श्री स्वामी समर्थ केमिस्टचे संचालक, सर्व पत्रकार मित्र आणि म्हाडाचे संचालक श्री. मधु चव्हाण व समिती सदस्य श्री. प्रकाश भवुड यांचे बहुमोल सहकार्य मंडळ विसरू शकत नाही.

* पंच परीक्षा – अहवाल वर्षी थेट राज्य परीक्षेला बसण्याची संधी प्राप्त झाली. त्या संधीचा लाभ घेऊन सर्वश्री श्रीकृष्ण राणे, संतोष शिगवण, योगेंद्र माने हे पंच व सांख्यिक परीक्षा उत्तीर्ण झाले, कु. जयश्री यादव ही पंच परीक्षा पास झाली. या सर्वांना आता राज्य मान्यता मिळाली आहे.

* मुंबई महापौर चषक स्पर्धेतील दिवसाचे मानकरी म्हणून कु. शिल्पा तोरणे हिचा तर जळगाव नगराध्यक्ष चषक स्पर्धेत कु. प्रीती धुरी हिचा गुणगौरव झाला.

* दैनंदिन सरावाची जबाबदारी सर्वश्री रमेश वरळीकर, प्रफुल्ल पाटील, संजय पेडणेकर, विजय राणे व रमेश नाटेकर यांच्याकडे असते. प्रशिक्षकांच्या गैरहजेरीत ज्येष्ठ खेळाडू जबाबदारी संभाळतात.



दैनंदिन सरावातून तसेच मित्रत्वाच्या सामन्यांतून तयार झालेले मंडळाचे खेळाडू आपापल्या शाळा व कॉलेजतर्फे खेळताना चमकदार कामगिरी करत असतात.

**कबड्डी :** * गेल्या वर्षी नव्याने तयार केलेला मुलींचा कबड्डी संघ समाधानकारक प्रगती करत आहे. या खेळाडूंना सामन्यांचा अनुभव जसा मिळत जाईल तशी त्यांची क्षमता वाढत जाणार आहे. मुलांचाही एक भक्कम संघ उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दोन्ही कबड्डी संघांच्या सरावाची जबाबदारी सर्वश्री विष्णू हरमले, विजय राणे व दिलीप भावे सांभाळत असतात.

* स्पर्धा संयोजन : मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने जिल्हा स्तरीय ज्युनिअर गटाच्या आमंत्रितांच्या कबड्डी स्पर्धेचे संयोजन आपल्याच पटांगणात केले. मुलांच्या गटात ८ संघांनी भाग घेतला तर मुलींचे १३ संघ सहभागी झाले होते. पारितोषिके व आकर्षक प्रशस्तिपत्रकांबद्दल कबड्डी रसिकांनी मंडळाचे अभिनंदन केले. मुंबई शहर संघटनेचे चांगले सहकार्य लाभले. उद्घाटन समारंभासाठी अन्नपूर्णाच्या संचालिका श्रीमती प्रेमाताई पुरव व राष्ट्रीय कबड्डी खेळाडू श्री. राणा तिवारी आणि समारोप समारंभाकरिता महाराष्ट्राची माजी कर्णधार सौ. वासंती (सावंत) बोर्डे व माजी नगरसेवक जयवंत पाटील यांची उपस्थिती लाभली.

**ॲथलेटिक्स** – इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या ५२ शाळांची ॲथलेटिक्स स्पर्धा झाली. त्यात मंडळाच्या कु. कविता धुरी (७ वी ते १० वी गटात) व कु. शुभदा धुरी (४ थी ते ६ वी गटात) यांनी २०० मि. शर्यतीचे सुवर्ण पदक पटकावले.

**इतर :** * मंडळाचे कबड्डी शिक्षक आणि कार्यकारी समिती सदस्य श्री. विष्णू हरमले यांची 'महेंद्र व महेंद्र (ट्रॅक्टर डिव्हीजन)' या नावाजलेल्या व्यावसायिक कबड्डी संघाच्या कर्णधारपदी निवड झाली.

* क्रीडा विभागासाठी नियतकालिके/पुस्तके घेण्यासाठी रु. ५००/ मंजूर करण्यांत आले.

* खेळाडूंत, कला आणि क्रीडा कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण व्हावे यासाठी एक वर्षासहल आयोजित करण्यांत आली.

* अहवाल काळांत क्रीडांगण दुरुस्ती करून घेण्यात आली.

* गेल्या ३ वर्षात खेळाडूंच्या सर्वांगीण विकासाच्या अनेक कल्पना राबवल्या. यात साधनांची खरेदी, वैयक्तिक कौशल्याला आव्हान देणारी 'आव्हान' योजना, वैद्यकीय मार्गदर्शन, सूचना फलकाद्वारे विविध खेळ, अभ्यासक्रम, व्यावसायिक मार्गदर्शन, या संबंधी माहिती देणारी कात्रणे, सहल, पालकांची सभा इत्यादी कार्यक्रमांचा समावेश असे. आज आपल्याकडे खोखोचे आणि कबड्डीचे अनेक होतकरू खेळाडू असे आहेत की ते नियमित सरावात राहिले व त्यांच्या पालकांचे उत्तम सहकार्य मिळाले तर त्यांचे भवितव्य उज्ज्वल आहे.

यंदापासून व्यायाम कक्ष सुरू केला आहे. उपलब्ध उपकरणांच्या सहाय्याने खेळाडू श्री. दिलीप भावे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करत असतात. आधुनिक उपकरणे आणण्याचा मानस आहे. मार्गदर्शक श्री. भावे हे शरीरसौष्ठव व्यायाम प्रकाराचे मान्यताप्राप्त प्रशिक्षक आहेत. जिल्हा संघटनेतर्फे त्यांची खास तज्ञ तसेच व्यवस्थापक म्हणून महत्त्वाच्या शरीर सौष्ठव स्पर्धेत अधिकृत नियुक्ती केली जाते.

**कलाविभाग :** सर्वश्री चिंतामणी नागले, श्री. विनोद हडप, श्री. दत्ता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचा कला विभाग प्रगतीपथावर आहे.

* बालनाट्य प्रशिक्षण शिबिर :

१९ एप्रिल ते १ मे या कालावधीत आयोजित केलेल्या या शिबिरात ४० शिबिरार्थींनी सहभाग नोंदवला. उद्घाटक श्री. माधव साखरदांडे तर समारोपासाठी प्रमुख पाहुणे अभिनेते श्री. अजय वढावकर उपस्थित होते. शिबिराचे संचालक श्री. सुहास कामत आणि सहसंचालिका कु. आश्विनी मोरे, कु. सीमा घोगळे यांनी परिश्रमपूर्वक शिबिराचे संचालन केले. श्री. शिवदास घोडके, सौ. अंशुमाला पाटील, श्री. विनोद हडप, श्री. दत्ता सामंत यांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली.

* ३६ व्या महाराष्ट्र राज्य स्पर्धेत श्री. विनोद हडप लिखित श्री. रामकृष्ण पार्टे दिग्दर्शित 'वड पारंब्यांचा' हे नाटक सादर केले. नाटकाला प्राथमिक फेरीत सर्वोत्कृष्ठ नाटक तृतीय पारितोषिक, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक द्वितीय पारितोषिक तर सर्वोत्कृष्ट नेपथ्य अशी पारितोषिके मिळाली. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त या नाटकाचे छबिलदास येथे दोन प्रयोग सादर करण्यात आले. नाटकात सहभागी



झालेले पन्नास कलाकार तसेच तंत्रज्ञ यांनी अत्यंत मेहनतीने नाटक उभे केले होते.

* प्रेक्षक न्यायाधीश एकांकिका स्पर्धा :

श्री. शिवदास घोडके, श्री. रामविजय परब यांच्या परिक्षणाखाली दि. २४ नोव्हेंबर १९९६ रोजी कामगार कल्याण मंडळ, नायगाव येथे प्राथमिक फेरी तर आठ एकांकिकांची अंतिम फेरी मंडळाच्या सभागृहात दि. ९ डिसें. व १० डिसें. रोजी पार पडली. उद्घाटक म्हणून अभिनेते श्री. अतुल परचुरे, श्री. संजय नार्वेकर, श्री. राजन भिसे उपस्थित होते. पारितोषिक वितरण समारंभ दि. ११ डिसें. रोजी अमिनेते, निर्माते, दिग्दर्शक श्री. विनय आपटे यांच्या हस्ते पार पडला. प्रेक्षक न्यायाधीश होते श्री. देवानंद भुवड, श्री. सर्वेष परब, श्री. अरूण राजदेरकर, श्री. अजित मोरे, डॉ. प्रफुल्लता सुकथनकर. कलाविभागाचे सक्रिय कार्यकर्ते मंडळाचे आजीव सभासद कै. खंडेराव ढगे यांच्या स्मृती प्रीत्यर्थ जाहीर केलेले सर्वोत्कृष्ट भित्तीचित्राचे पारितोषिक कला अभियान या संस्थेला मिळाले. स्पर्धा पार पाडण्यासाठी श्री. सुहास कामत, कु. प्रेरणा सावंत, श्री., अभय हडप, श्री. प्रदीप रांगणेकर, श्री. सानप, श्री. वर्दम, श्री. गोविंद कुलकर्णी इत्यांदीचे बहुमोल सहकार्य लाभले.

* व्यक्तिमत्त्व विकास शिबिर :

अत्यंत उपयुक्त असा हा उपक्रम सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आला. शिबिर संयोजक श्री. सुहास कामत, सहसंयोजिका कु. प्रेरणा सावंत यांच्या सोबत श्री. दत्ता सावंत यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. १४ डिसेंबर रोजी सुरु झालेल्या या शिबिरांचा समारोप २६ डिसेंबर रोजी डॉ. रवि बापट यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अ. भा. नाट्य परिषदेच्या हौशी रंगमंच शाखेने या शिबिरासाठी जागा उपलब्ध करून दिली. डॉ. जोत्स्ना नाडकर्णी, श्रीमती उषा देशपांडे, श्री. सुरेश जोशी, श्री. अरुण नायक, श्री. अजय ताम्हाणे यांनी व्यक्तिमत्त्व विकास, ताणतणावमुक्ती, परस्परसंबंध, देहबोली, वाणीशुद्धता मुलाखतीचे तंत्र, समस्या विमोचन इत्यादी विषयांवर अत्यंत उपयुक्त असे मार्गदर्शन केले. त्याचा लाभ चाळीस शिबिरार्थींनी घेतला.

**इतर :**

* ८ ते १० जुलै १९९६ च्या दरम्यान मंडळाच्या वतीने मंडळाचे कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांच्या टपाल तिकीटांवर आधारित 'स्टॅम्पा

ऑलिंपिक' हे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यांत आले होते. त्यांचे उद्घाटन मुख्यमंत्री मा. मनोहर जोशी यांच्या हस्ते करण्यांत आले. या प्रसंगी उद्योगपती श्री. मेहुल भुवा, कामगार नेते श्री. बाबुराव रामिष्टे. स्टॉक ब्रोकर श्री. अरविंद भिडे, नगरसेवक श्री. गणेश महाले इ. मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी श्री. शेणॉय यांना ऑलिंपिक स्पर्धेसाठी या कार्यक्रमांत शुभेच्छा दिल्या.

**विशेष अभिनंदनीय :** दि. १९ जुलै ते ४ ऑगस्ट १९९६ या दरम्यान 'अटलांटा' येथे झालेल्या शतकी ऑलिंपिक स्पर्धेमधील ऑलिंपिक आधारीत टपाल तिकीटांच्या माध्यमांतून 'ऑलिंपिक विषय' साकार करण्याच्या जागतिक स्पर्धेत आपल्या संस्थेचे कार्यवाह उमेश शेणॉय यांनी **ब्राँझ पदक** मिळवून देशाची शान वाढवि[ली] हार्दिक अभिनंदन.

* दीपावली शुभेच्छा पत्रके प्रतिवर्षाप्रमाणे पाठविण्यांत आली.

दि. २६ जानेवारी १९९६ ते १ मे १९९७ हा कालावधी मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमासाठी राखून ठेवण्यांत आला. हे कार्यक्रम आखण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष श्री. शंकरराव साळवी, उपाध्यक्ष श्री. मधुकर फडके, कार्याध्यक्ष श्री. चिंमामणी नागले आणि सदस्य श्री. अरुण देशपांडे यांची एक उपसमिती स्थापन करण्यांत आली. दिनांक ३० डिसेंबर १९९६ रोजी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी त्यांच्या दालनांत यासाठी एक विशेष सभा आयोजित केली होती. त्या ठिकाणी मंडळाच्या वतीने त्यांना करण्यांत आलेल्या विनंतीनुसार त्यांनी सुवर्ण महोत्सवी समितीचे अध्यक्षपद स्वीकारल्याचे जाहीर केले. त्याचवेळी अपेक्षित कार्यक्रमाची सूची त्यांच्या खर्चाच्या अंदाजासह स्वीकृत करण्यांत आली. मुख्यमंत्र्यांनी मंडळाला सर्व प्रकारची मदत देण्याचेही तेथे जाहीर केले.

अहवाल काळांत पुढील सुवर्णमहोत्सवी कार्यक्रम मोठ्या दिमाखांत पार पडले.

**कार्यक्रम :**

* प्रेक्षक न्यायाधीश एकांकिका स्पर्धा.
* मंडळाचे दोन अंकी प्रहसनात्मक नाटक ''वड पारब्यांचा''
* व्यक्तिमत्व विकास शिबिर

} 'कला विभाग' या सदरांत यासंबंधी विस्तृत माहिती देण्यांत आलेली आहे.



* ज्युनिअर गट (मुले-मुली) आमंत्रितांची जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धा.
* सब-ज्युनिअर (किशोर-किशोरी) गटाच्या राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा.

} 'क्रीडा विभाग' या सदरांत यासंबंधी विस्तृत माहिती देण्यांत आलेली आहे.

* **विवेकानंद व्याख्यानमाला :** दिनांक ७ ते १२ जानेवारी १९९७ या दरम्यान 'स्वामी विवेकानंद जन्मशताब्दी' निमित्त डॉ. शंकर अभ्यंकर यांची विद्वत्तापूर्ण आणि ओघवत्या भाषेतील 'स्वामी विवेकानंदाच्या' जीवनांवरील एक विशेष व्याख्यानमाला आयोजित केली होती. या कार्यक्रमास 'कालनिर्णय' ने पुरस्कृत केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुरेश बोरकर यांनी केले तर समारोप प्रसंगी ज्योतिर्भास्कर मा. श्री. जयंतराव साळगांवकर हे उपस्थित होते मुंबईतील आणि मुंबई बाहेरील अनेक श्रोत्यांनी या व्याख्यानमालेचा लाभ घेतला.

* मंडळाचा सुवर्णमहोत्सवी वर्धापन दिन दि. २६ जाने. १९९७ रोजी मोठ्या दिमाखांत साजरा करण्यांत आला. सकाळी प्रजासत्ताक दिनानिमित्त मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव साळवी यांच्या शुभहस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम पार पाडण्यांत आला. प्रसिद्ध गायक/संगीतकार श्री. यशवंत देव यांचा ''गप्पा गाणी, बोल गाणी'' या मराठी गीतांचा कार्यक्रम सायंकाळी सादर करण्यांत आला. हा संपूर्ण कार्यक्रम श्री समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे संस्थापक कै. कमलाकरपंत वालावलकर यांच्या स्मरणार्थ श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी पुरस्कृत केला होता.

* **महिला परिषद :** ९ फेब्रुवारी १९९७ रोजी एक राज्यव्यापी 'महिला परिषद' आयोजित करून मंडळाने अनेक महिलांना मंडळाच्या कार्याकडे आकर्षित केले.

उद्योजक, कलावंत, कवयित्री, खेळाडू, पत्रकार, इ. विविध क्षेत्रांत दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या महिलांनी आपली मनोगते उपस्थितांसमोर मांडली. श्रीमती विद्या बाळ यांनी उद्घाटन केलेल्या या कार्यक्रमांत सुमारे ३०० महिला दिवसभर सहभागी झालेल्या होत्या. सर्व उपस्थितांची चहापान, जेवण, अल्पोपहार यांची व्यवस्था मंडळाने चांगल्या प्रकारे केली होती. या कार्यक्रमाचा सांगता समारंभ सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शैला लोहिया यांच्या व्याख्यानाने झाला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट ५ पान २१ पाहा.)

* मंडळाचे माळी कै. अर्जुन कुले यांच्या कुटुंबियांना यथायोग्य मदत अहवाल काळांत देण्यांत आली. वार्षिक सर्वसाधारण सभेत आवाहन केल्यानंतर सभासदांनी आणि हितचिंतकांनी दिलेली रक्कम त्यांत समाविष्ट करण्यांत आली.

या व्यतिरिक्त अहवाल काळानंतर पुढील सुवर्णमहोत्सवी कार्यक्रम आखण्यांत आले.

* सुवर्णमहोत्सवी वसंत व्याख्यानमाला.
* बालनाट्य प्रशिक्षण शिबिर.
* बालकलाकारांनी आणि प्रशिक्षण शिबीरार्थीनी बसविलेल्या बाल नाट्याचे जाहीर प्रयोग.

❁ ❁ ❁

## श्रद्धांजली

मंडळाचे तहहयात सभासद श्री. खंडेराव ढगे यांचे दिनांक २० जून १९९६ रोजी देहावसान झाले. मंडळ एका धडाडीच्या कार्यकर्त्याला आणि मार्गदर्शकाला मुकले. मंडळाच्या वतीने त्यांना साश्रूपूर्ण श्रद्धांजली.



# परिशिष्ट ५
## महिला परिषद
## कार्यक्रम

**सत्र पहिले**

| | |
|---|---|
| सकाळी ९ ते १२ | श्रीमती हेमा जोशी यांच्या मंगलगीताने कार्यक्रमाची सुरुवात होईल. **श्रीमती विद्या बाळ** परिषदेचे उद्‌घाटन करतील. ***'उद्योजक महिला व विविध क्षेत्रातील महिलांचे मनोगत'*** |
| सहभाग : | श्रीम. विजया लवाटे, श्रीम. सुरेखा दळवी, श्रीम. फरीदा लांबे, श्रीम. हेमा गुरव, श्रीम. आमदार मीनाक्षी पाटील, श्रीम. आशा कबरे मटाले, श्रीम. नीता खांडेकर, श्रीम. मोडीका. या कार्यक्रमाचे संचालन करतील श्री. विद्या बाळ. |
| दुपारी १२ ते १ | ***भोजन*** |

**सत्र दुसरे**

| | |
|---|---|
| दुपारी १ ते ३ | कलावंतांचे मनोगत |
| **सहभाग :** | श्रीम. सुधा करमरकर, श्रीम. जोत्सा कार्येकर, श्रीम. आशालता, श्रीम. प्रतिक्षा लोणकर, श्रीम. सीमा देव, श्रीम. स्मिता तळवलकर, श्रीम. मनोरमा वागळे, श्रीम. चारुशिला ओक. या कार्यक्रमाचे संचालन करतील श्रीम. संजीवनी खेर. |

**सत्र तिसरे**

| | |
|---|---|
| सायंकाळी ३ ते ५.३० | कवयित्री संमेलन |
| **सहभाग :** | श्रीम. शिरीष पै, श्रीम. वृंदा लिमये, श्रीम. पद्मा लोकूर, श्रीम. रजनी परुळेकर, श्रीम. उषा मेहता, श्रीम. निरजा, श्रीम. प्रज्ञा लोखंडे, श्रीम. भिसे. या कार्यक्रमाचे संचालन करतील श्रीम. प्रभा गणोरकर. |
| सायंकाळी ५.३० ते ६ | ***कॉफी पान.*** |
| सायंकाळी ६ नंतर | समारंभाची सांगता, स्मृतिचिन्हे, पुष्पगुच्छ, भेटवस्तू देण्याचा समारंभ, ***आभारप्रदर्शन*** मराठवाड्यातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या **श्रीम. शैला लोहिया** या कार्यक्रमाचा समारोप करतील. |

# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई–२८

## ३१ मार्च १९९६ आणि ३१ मार्च १९९७ अखेरच्या मुदतठेवींची विगतवारी

### परिशिष्ट 'अ'

| रुपये पैसे | | परिशिष्ट 'अ' रुपये पैसे | परिशिष्ट 'ब' रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ५१३१२.०० | अभ्युदय को-ऑप. बँक लि. | ५६९१६.०० | ६३३२४.४५ |
| ५१४७४.८६ | सारस्वत को-ऑप. बँक लि. | ५७०९६.२७ | — |
| २६१४४.०० | दि कॉसमॉस को-ऑप. बँक | २८९९९.०० | ३२७९०.०० |
| २५२३९.६० | दि नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. बँक लि. | २५२९१.६५ | १०७३९०.३० |
| १६९७६५.०० | बँक ऑफ इंडिया | २२६१११.०० | २५१७५४.०० |
| १३४०२८.४५ | स्टेट बँक ऑफ इंडिया | १४३२४३.४५ | १५२२६५.०० |
| १५३२७०.०० | बँक ऑफ महाराष्ट्र | १६९८८०.०० | १२५८३५.०० |
| ५०२६०.०० | कॅनरा बँक | ५५२६०.०० | — |
| २५३०९.०० | युनायटेड वेस्टर्न बँक | २८१७५.०० | ३१४४८.०० |
| ५२०८३.०० | युनियन बँक ऑफ इंडिया | १३०२८६.०० | २०१५२६.०० |
| २६०२५.०० | अपना सहकारी बँक लि. | २८,८००.०० | — |
| ७६४९१०.९१ | एकूण | ९५००५८.३७ | ९६६३३२.७५ |
| | | दि. २६-९-९६ | दि. २८-७-९७ |

**सु. ल. सराफ**
भागीदार : सराफ असोसिएटस् – चार्टर्ड अकौन्टन्टस्

| **चिं. वि. नागले** | **उ. व्यं. शेणॉय** | **स. श. रेडीज** |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | कार्यवाह | कोषाध्यक्ष |

अमर हिंद मंडळासाठी



## परिशिष्ट १ व ३

कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती

| | परिशिष्ट १ १९९५-९६ | परिशिष्ट ३ १९९६-९७ |
|---|---|---|
| (१) श्री. शंकरराव ना. साळवी (अध्यक्ष) | ८ | ४ |
| (२) श्री. एकनाथ ना. साटम (उपाध्यक्ष) | ५ | २ |
| (३) श्री. मधुकर ज. फडके (उपाध्यक्ष) | ५ | ४ |
| (४) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | १३ | १० |
| (५) श्री. रमेश मा. वरळीकर (कार्योपाध्यक्ष) | १३ | ९ |
| (६) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | १३ | ९ |
| (७) श्री. दीपक ना. पडते (स. कार्यवाह) | ७ | ४ |
| (८) श्री. सतीश श. रेडीज (कोषाध्यक्ष) | १३ | १० |
| (९) श्री. अरुण अ. देशपांडे (सदस्य) | १३ | ६ |
| (१०) श्री. विष्णू अ. कानविंदे (सदस्य) | १ | २ |
| (११) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (सदस्य) | ९ | ६ |
| (१२) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ० | ० |
| (१३) श्री. विष्णू दे. हरमले (सदस्य) | १२ | ६ |
| (१४) श्री. चारुदत्त शा. थरवल (सदस्य) | ९ | ६ |
| (१५) श्री. भास्कर भि. केरकर (सदस्य) | ११ | ६ |
| (१६) श्री. विनोद श. हडप (सदस्य) | ८ | ६ |
| (१७) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य) | ५ | ३ |
| (१८) श्री. संजीव ग. ठाकूरदेसाई (सदस्य) | ४ | — |

## परिशिष्ट २

### वसंत व्याख्यानमाला (वर्ष ४८ वे)

### कार्यक्रम-पत्रिका

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | : | व्याख्यानमालेचे उद्घाटन सायं ७ वा. |
| दिनांक २०-४-९५ | | उद्घाटक : मा. मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी<br>विषय : "आमचा स्वप्नातील महाराष्ट्र" |
| शुक्रवार | : | ज्येष्ठ पत्रकार श्री. अरुण टिकेकर |
| दिनांक २१-०४-९५ | | (संपादक : लोकसत्ता)<br>विषय : "आजची पत्रकारिता" |
| शनिवार | : | कर्नल अनिल आठल्ये |
| दिनांक २२-०४-९५ | | विषय : "शीतयुद्धानंतरच्या जगाची भारतापुढील आव्हाने" |
| रविवार | : | प्रा. मधू दंडवते (माजी केंद्रीय अर्थमंत्री) |
| दिनांक २३-०४-९५ | | विषय : "१९९५-९६चा अर्थसंकल्प" |
| सोमवार | : | प्राचार्य शिवाजीराव भोसले |
| दिनांक २४-०४-९५ | | विषय : "विज्ञान, धर्म आणि समाज" |
| मंगळवार | : | डॉ. य. दि. फडके |
| दिनांक २५-०४-९५ | | विषय : "विधानसभा निवडणुकीनंतरचा भारत" |
| बुधवार | : | पद्मभूषण डॉ. रामचंद्र द. लेले, श्री. अनंत शं. |
| दिनांक २६-०४-९५ | | मेढेकर आणि ॲड. सी. आर. दळवी<br>विषय : "वैद्यकीय व्यवसाय आणि ग्राहक संरक्षण कायदा" |
| गुरुवार | : | श्री. बाळासाहेब भारदे (माजी सभापती, महाराष्ट्र राज्य) |
| दिनांक २७-०४-९५ | | विषय : "भारतीय लोकशाहीचे भवितव्य" |
| शुक्रवार | : | डॉ. यशवंत पाठक |
| दिनांक २८-०४-९५ | | विषय : "एका जनार्दनी शरण" |
| शनिवार | : | डॉ. वि. गो. कुलकर्णी |
| दिनांक २९-०४-९५ | | विषय : "एकविसाव्या शतकाला सामोरे जाताना" |
| रविवार | : | व्याख्यानमालेचा समारोप |
| दिनांक ३०-०४-९५ | | कविवर्य नारायण सुर्वे यांचा सत्कार ज्येष्ठ पत्रकार श्री अरुण साधू यांच्या हस्ते त्यानंतर श्री. नारायण सुर्वे यांचे व्याख्यान<br>विषय : "मी असा घडलो" |

**वेळ : रोज सायंकाळी ७-०० वाजता**



## परिशिष्ट ४

### वसंत व्याख्यानमाला ( वर्ष ४९ वे )

### कार्यक्रम – पत्रिका

| | | |
|---|---|---|
| रविवार | : | व्याख्यानमालेचे उद्घाटन सायं ७.१५ वा. |
| दिनांक २१-४-९६ | | उद्घाटक : श्रीमती शांता शेळके<br>( अध्यक्षा, अ. भा. मराठी साहित्य संमेलन )<br>विषय : मराठी भाषेची बदलती वळणे |
| सोमवार | : | प्रा. राम शेवाळकर |
| दिनांक २२-४-९६ | | विषय : महारथी कर्ण |
| मंगळवार | : | डॉ. यशवंत पाठक |
| दिनांक २३-४-९६ | | विषय : उत्कृष्ट भव्य तेचि घ्यावे |
| बुधवार | : | डॉ. प्रदीप पाटकर ( मानसोपचार तज्ज्ञ ) |
| दिनांक २४-४-९६ | | विषय : मुले अशी का वागतात ? |
| गुरुवार | : | प्राचार्य राम जोशी |
| दिनांक २५-४-९६ | | विषय : राजकीय स्थैर्यासाठी अध्यक्षीय पद्धती स्वीकारावी काय ? |
| शुक्रवार | : | डॉ. वि. गो. कुलकर्णी |
| दिनांक २६-४-९६ | | ( डॉ. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे माजी संचालक )<br>विषय : फ्रान्सचा अणुस्फोट व त्रिशंकू भारत |
| शनिवार | : | प्रा. मधुकर तोरडमल |
| दिनांक २७-४-९६ | | विषय : मराठी नाट्यविषयक मुलाखत<br>मुलाखतकार : श्री. दामू केंकरे |
| रविवार | : | श्री. शिवाजी सावंत |
| दिनांक २८-४-९६ | | विषय : छत्रपती शिवराय व शंभूराजे – एक नवे आकलन |
| सोमवार | : | श्री. कुमार केतकर ( संपादक : महाराष्ट्र टाइम्स ) |
| दिनांक २९-४-९६ | | विषय : नवे आर्थिक धोरण आणि नवे राजकारण |
| मंगळवार | : | प्रा. मे. पु. रेगे |
| दिनांक ३०-४-९६ | | विषय : धर्म आणि भारतीय समाज |

**वेळ : रोज सायंकाळी ७-१५ वाजता**